दिनांक ३०/०१/२०२१

**प्रसिध्दी पत्रक**

**१) आरोपी लोकसेवक सिराज इकबाल पठाण, पद- पोलीस हवालदार, नेमणुक-पोलीस स्टेशन करमाड, औरंगाबाद ग्रामीण, २) खाजगी इसम- युवराज नाथा मुळे, अॅपे रिक्षा चालक, रा. करमाड, ता.जि.औरंगाबाद यांनी ७,०००/- लाचेची मागणी केल्याने त्यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे कारवाई**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे /आरोपीचे नाव हुद्दा व पत्ता | :- | १)आरोपी लोकसेवक सिराज इकबाल पठाण, पद- पोलीस हवालदार, नेमणुक पोलीस स्टेशन करमाड, औरंगाबाद ग्रामीण,<br>२)खाजगी इसम- युवराज नाथा मुळे, अॅपे रिक्षा चालक, रा. करमाड, ता.जि.औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे करमाड, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्री.नंदकिशोर क्षीरसागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागणी रक्कम | :- | ७,०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्याविरुध्द पोलीस ठाणे करमाड, औरंगाबाद ग्रामीण येथे कलम ४९८ भा.दं.वि नुसार दाखल गुन्हयात मदत करण्यासाठी |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांच्याविरुध्द पोलीस ठाणे करमाड, औरंगाबाद ग्रामीण येथे कलम ४९८ भा.दं.वि नुसार दाखल गुन्हयात मदत करण्यासाठी सिराज पठाण, पोलीस हवालदार, पोलीस ठाणे करमाड यांनी तक्रारदार यांच्याकडे ७,०००/- रु लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, सिराज पठाण पोलीस हवालदार, पोलीस ठाणे करमाड व युवराज मुळे, अॅपे रिक्षा चालक यांनी तक्रारदार यांच्याकडे ७,०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन वर नमुद दोन्ही आरोपी यांचेविरुद्ध पोलीस ठाणे करमाड, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. नंदकिशोर क्षीरसागर यांनी केली आहे. त्यांना पोलीस अंमलदार गणेश पंडुरे, रविंद्र देशमुख, मिलींद इप्पर, चालक पोलीस अंमलदार चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

पोलीस उप अधीक्षक कार्यालय, अँटी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.